# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 40101.
दुरध्वनी क्र. 022-28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/1222/2025-26 दि.15/7/2025

विषय :- मिरा-भाईंदर महानगरपलिका आस्थापनेवरील अग्निशमन प्रणेता / चालक-यंत्रचालक या पदावर कार्यरत कर्मचारी यांना सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :-
1. जा.क्र.मनपा/सा.प्र./1489/2015, दि.16/12/2015 रोजीचा आदेश.
2. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक -मिभाम-116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019.
3. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक -मिभाम-116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28/05/2019.
4. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही 2018/प्र.क्र.159/कार्यासन 12, दि.01/08/2019.
5. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे 2021.
6. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:-मिभाम-116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25/11/2021.
7. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1123/प्र.क्र.22/नवि-28, दि.07/06/2023
8. मा.विभागीय पदोन्नती निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत दि.08/07/2025

## आदेश

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अग्निशमन प्रणेता / चालक-यंत्रचालक या संवर्गातील कर्मचारी यांना पदोन्नती देणेबाबत संदर्भ क्र.08 नुसार पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.02 ते 07 वरील शासन निर्णयास अनुसरुन अग्निशमन प्रणेता / चालक-यंत्रचालक या संवर्गातील खालील कर्मचारी यांना सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीशर्तीच्या अधिन राहून आदेशाच्या दिनांकापासुन पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सध्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणुक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. राकेश बाबुराव भोसले S-8 25500-81100 | अग्निशमन प्रणेता | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 2. | श्री.संजयकुमार वासुदेव पाटील S-8 25500-81100 | अग्निशमन प्रणेता | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3. | श्री. संतोष मोहन गिते<br>S-8 25500-81100 | अग्निशमन प्रणेता | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 4. | श्री. सचिन अशोक परब<br>S-8 25500-81100 | चालक - यंत्रचालक | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 5. | श्री. संतोष नारायण दुखंडे<br>S-8 25500-81100 | चालक - यंत्रचालक | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 6. | श्री. संजय तुकाराम मोरे<br>S-8 25500-81100 | अग्निशमन प्रणेता | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 7. | श्री. लक्ष्मण मुरारी भंडारी<br>S-8 25500-81100 | चालक - यंत्रचालक | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 8. | श्री. रविंद्र जयवंत पाटील<br>S-8 25500-81100 | अग्निशमन प्रणेता | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 9. | श्री. राकेश सिताराम आंब्रे<br>S-8 25500-81100 | अग्निशमन प्रणेता | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 10. | श्री. अरुण बाळकृष्ण शिर्के<br>S-8 25500-81100 | अग्निशमन प्रणेता | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 11. | श्री. प्रशांत रामचंद्र निरभवणे<br>S-8 25500-81100 | अग्निशमन प्रणेता | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 12. | श्री. सतिश बाबुलाल गांगुर्डे<br>S-8 25500-81100 | अग्निशमन प्रणेता | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |
| 13. | श्री. प्रदिप मुरलीधर पाटील<br>S-8 25500-81100 | चालक - यंत्रचालक | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-13 35400-112400 |

अटीशर्ती :-

1. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक 28306/2017 तसेच दि.07/05/2021 च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.
2. पदोन्नत कर्मचाऱ्याने पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/कार्या-12, दि. 12/09/2016 मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

3. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना नियमीतपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.
4. सद्य:स्थितीत अग्निशमन प्रणेता / चालक-यंत्रचालक या पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन पदोन्नती देण्यात येत आहे.
5. सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावरील पदोन्नती ही त्यांच्या विरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही हे विचारात घेऊन पदोन्नती देण्यात येत आहे.
6. उपरोक्त नमुद कर्मचाऱ्यानी पदोन्नतीने नियुक्तीचे आदेश प्राप्त होताच 07 दिवसात अथवा निम्नस्वाक्षरीत मंजूर करतील अशा वाढीव मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर व्हावे. तसेच पदभार स्विकारुन त्याबाबतचा अहवाल प्रशासनास तात्काळ सादर करावा. त्याचप्रमाणे विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर न झाल्यास अथवा पदोन्नती न स्विकारल्यास पदोन्नती आपोआप रद्द होईल. तसेच सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही-1087/1131/प्र.क्र.11-89/बारा, दि.30 एप्रिल, 1991 मधील तरतुदीनुसार त्यांचे नाव निवडयादीतून काढून टाकण्यात येईल.
7. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 मधील नियम 11 (1) (ए) व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009 मधील नियम 13 (अ) (1) (2) (ब) (1 व 2) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन त्यांची वेतननिश्चिती करण्यात येईल.
8. यासंदर्भात कोणताही शासन निर्णय/परिपत्रक/आदेश/कायदा/मा. न्यायालयीन आदेश/नियमातील सुधारणा इत्यादीमुळे आवश्यक असतील त्याबाबतीत सदर आदेश रद्द करणे/सुधारीत आदेश काढणे याबाबतचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:- माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्त्व
1. अतिरिक्त आयुक्त (1/2)
2. उपायुक्त (सर्व)
3. मुख्यलेखापरीक्षक
4. मुख्यलेखाधिकारी
5. संबंधीत विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख
6. संबंधितांस
7. आस्थापना निवडनस्ती